
# HISTORY BY I.SHRIKANT




# आधुनिक भारताचा इतिहास



# युरोपियनांचे भारतात आगमन

- 1453 या वर्षी ऑटोमन तुर्कांनी  कॉन्स्टन्टिनोपाल (आताचे इस्तंबूल) हे शहर जिंकल्याने भारत-युरोप यांमधील 'इराणचे आखात कॉन्स्टन्टिनोपाल-इटली' हा खुष्कीचा व्यापारी मार्ग बंद झाला. त्यामुळे भारताकडे जाणाऱ्या नव्या सागरी मार्गांचा  शोध लावणे युरोपियनांना क्रमप्राप्त ठरले.
- 1492 या वर्षी इटलीच्या कोलंबस याने अॅटलांटिक महासागर पार करून भारताकडे जाण्याचा प्रयत्नात अमेरिका खंडाचा शोध लावला.



- खिस्तोफर कोलंबस  हे मूळचे **इटली** या देशातील होते. त्यांचा जन्म 1451 मध्ये इटलीच्या जेनोआ  प्रजासत्ताकात झाला होता. मात्र, त्यांनी स्पेनचा राजा फर्डिनांड आणि राणी इसाबेला यांच्या आश्रयाखाली आपल्या प्रसिद्ध सागरी मोहिमा काढल्या आणि अमेरिका खंडाचा शोध लावला

- 20 मे 1498 रोजी वास्को द-गामा या पोर्तुगिज खलाशाने आफ्रिकेच्या दक्षिण टोकाला वळसा घालून कालिकत बंदरात प्रवेश केला.
- कालिकतचा हिंदू राजा झामोरिन याने वास्को-द-गामाचे स्वागत केले.





- कालिकत बंदर (आताचे **कोझिकोड**) हे भारताच्या दक्षिण भागातील **केरळ** राज्यात अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर (मलबार कोस्ट) स्थित आहे.
- 1498मध्ये वास्को द गामा येथेच पोहोचला होता, जे मसाल्यांच्या व्यापाराचे ऐतिहासिक केंद्र होते.
- सध्या हे एक प्रमुख व्यापारी आणि ऐतिहासिक शहर म्हणून ओळखले जाते.



- भारतीय भूमीवर पाय ठेवणारा वास्को द-गामा हा पहिला युरोपियन ठरला.
- वास्को द-गामा आपल्या आयुष्यात तीन वेळा भारतात आला (1498, 1502, आणि 1524)
- 1524 मध्ये तिसऱ्यांदा भारतात असताना कोचीन येथे त्याचा मृत्यू झाला.
- वास्को द-गामाच्या या शोधामुळे युरोपीय सत्तांसाठी (पोर्तुगीज, डच, ब्रिटिश) भारताचे दरवाजे उघडले गेले

- भारतातील व्यापारात सुरवातीला पोर्तुगिज आघाडीवर होते. व्यापाराबरोबरच साम्राज्यविस्तारावर भर देताना पोर्तुगिजांनी 1510 साली आदिलशहाकडून जिंकून घेतलेले गोवा हे आपले मुख्य केंद्र बनवले.
- पोर्तुगिजांनंतर डच, इंग्रज, फ्रेंच इत्यादी व्यापाऱ्यांनीही आपला मोर्चा भारतीय बाजारपेठांकडे वळविला.

# भारतात युरोपियन सत्तांच्या आगमनाचा क्रम :

1) पोर्तुगिज (1498)

2) डच (1605)

3) ब्रिटिश (1608)

4) डेन्मार्क (1620)

5) फ्रेंच (1664).




# 1)पोर्तुगिज

- वास्को द-गामाने कालिकत, कोचीन व कन्नोर येथे व्यापारी केंद्रे स्थापन केली.
- 1505 : फ्रान्सिस्को डी अल्मेडा  भारतातील पहिला पोर्तुगीज गव्हर्नर . त्याने हिंद महासागरात पोर्तुगिजांची स्थिती मजबूत केली.



- **1509 :**   अल्फान्सो डी अल्बुकर्क हा दुसरा गव्हर्नर झाला.
- त्याने **1510** मध्ये विजापूरच्या आदिलशाहकडून गोवा जिंकून घेतले.
- त्याने विजयनगरच्या राजाशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करून त्यांना अरबी घोड्यांचा पुरवठा केला.

# पोर्तुगीज्यांच्या पश्चिम आणि पूर्व किनाऱ्यावरील वसाहती:

- **पश्चिम किनारा :** कोचीन, गोवा, दमण, चोल,दीव,साष्टी,वसई, होनार, गंगोळी, मंगलोर, बसरूर, कन्नूर, कोंडूगल्लूर, कोची व कोल्लम.
- **पूर्व किनारा :** नागपट्टनम, मद्रासजवळ मयीलापूर,बंगालमध्ये हुगळी, चितगाव



- **1530** : गव्हर्नर निनो द कुन्हा याने राजधानी कोचीनहून गोव्याला हलवली.
- **1534** : गुजरातच्या बादशाहकडून दीव, साष्टी व वसई जिंकून घेतले. गुजरातचा राजा बहादूरशाह याला पोर्तुगिजांनी मारले.

# पोर्तुगीज गव्हर्नर

1)फ्रान्सिको डी अल्मेडा (1505-1509)

2)अल्फान्सो डी अल्बुकर्क (1509-1515)

3)दियागो लोपेज द सेक्कीरा (1518-1522)

4)वास्को द गामा (1524-1524)

5) निनो द कुन्हा (1529-1538)

6)मार्टिन अल्फान्सो डिसूझा (1542-1545)

7) जॉन कॅस्ट्रो (1546)

- भारतातील पोर्तुगिजांचा एकूण 128 वा व शेवटचा गव्हर्नर जनरल म्यॅन्यूएल अँटोनिओ व्हॅसालो-इ-सिल्वा (1958 ते 1961)

## 2)डच

- 1596 : मध्ये कॉर्नेलियस डे हाऊटमन हा भारतात पोहोचणारा पहिला डच प्रवासी ठरला.
- 1602 : हॉलंडमधील काही व्यापाऱ्यांनी डच ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना केली.
- 1605 : भारतातील पहिली कायमस्वरूपी व्यापारी वसाहत आंध्र प्रदेशातील मसलीपट्टणम (मच्छलीपट्टणम) येथे स्थापन केली

**भारतातील डचांनी स्थापन केलेल्या वसाहती :**

1)मसलीपट्टणम (1605)

2)पुलिकत (1610)

3)सुरत (1610)

4)बिमलिपत्तम (1641)

5) कारीकल (1645),

6)चिनसुरा (1653)

- याबरोबरच कासिमबझार, बारानागोर, पाटणा, पेतापुली, तिरुपापुलीयर, पोर्टनोव्ह, ठठा, आग्रा, अहमदाबाद, भडोच, खंबायत, बालासोर, नागापट्टणमम, कोचीन येथे डच वसाहती स्थापन झाल्या.
- डचांनी पोर्तुगिजांचा पराभव करून आजच्या कोची येथे फोर्ट विल्यम बांधला.

1690 च्या आधी पुलिकत हे डचांचे भारतातील प्रमुख केंद्र होते.

विजयनगरच्या परवानगीने त्यांनी पुलीकत आणि नागपट्टनम येथे किल्ले बांधले.

- कोचीच्या राजाशी तह करून डचांनी काळ्या मिरीची निर्यात करण्याचा एकाधिकार मिळविला.
- 17 व्या शतकाच्या सुरुवातीला डचांचे आरमार प्रबळ होते.
- ब्रिटिशांनी 1759 मध्ये बेदेराच्या लढाईत डचांचा अंतिम पराभव केला.



## 3)ब्रिटिश


- 1599 मध्ये इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली. इंग्लंडची राणी एलिझाबेथने या कंपनीला 31 डिसेंबर 1600 रोजी सनद देऊन पुढील 15 वर्षांसाठी भारतासहित पूर्वेकडील देशांशी व्यापार करण्याचा अधिकार दिला.

- 1609 : राजा जेम्स पहिला याने कंपनीला अमर्यादित कालावधीसाठी व्यापाराचा अधिकार दिला.
- **कंपनीच्या कामाचे सुरवातीचे स्वरूप :**
- जहाज पूर्वेकडील देशात पाठविणे, तेथे माल विकून जो पैसा मिळेल त्यातून आणि पाठविलेल्या रोख रकमेतून प्रामुख्याने मसाल्याचे पदार्थ खरेदी करणे, ते इंग्लंडमध्ये विकणे व नफा मिळविणे हे कंपनीच्या कामाचे सुरुवातीचे स्वरूप होते.

- 1609: ईस्ट इंडिया कंपनीला सुरत येथे वखार स्थापन करायची होती. त्याची परवानगी घेण्यासाठी कॅप्टन हॉकिन्स मुघल बादशाह जहांगीरच्या आग्रा येथील दरबारात गेला होता. पण त्यावेळी त्याला तशी परवानगी मिळाली नाही.
- इंग्रजांनी पोर्तुगीज आरमाराचा पराभव केल्यामुळे प्रभावित होऊन बादशाह जहांगीरने 1613 साली इंग्रजांना सुरत येथे वखार स्थापन करण्याची परवानगी दिली. पण इंग्रजांची भारतातील पहिली वखार 1611 मध्ये मसलीपट्टणम येथे स्थापन झाली होती.

# इंग्रजांच्या वखारी

1)मसलीपट्टणम (1611)
2)सुरत (1613)
3)बालासोर (ओरिसा) - (1633)
4)मद्रास (1639)
5)हुगळी (1651)
6)मुंबई (1668)
7)कलकत्ता(1698)




# 4)डेन्मार्क

- 1616 : डेन्मार्कच्या डॅनिश व्यापाऱ्यांनी  ईस्ट इंडिया कंपनी स्थापन केली.( 1730 : 'डॅनिकश एशियाटीक कंपनी' )
- 1620 : भारतात  तंजावरच्या नायक राजाकडून त्रंकेबार (तमिळनाडू) हे बंदर मिळवून तेथे वसाहत व किल्ला बांधला.

- 1698 :  सेरामपूर (बंगालमध्ये हुगळी नदीच्या तीरावर) येथे व्यापारी वसाहत स्थापन केली. स्थानिक जहाजांची लूट, गुलामांची विक्री या कारणांमुळे मुघल बादशाहाच्या विरोधामुळे त्यांना सेरामपूर सोडावे लागले.
- 1755:  डॅनिश कंपनी व्यापाराच्या उद्देशाने पुन्हा बंगालमध्ये परतली. त्यांनी सेरामपूरला डेन्मार्कचा राजा फ्रेडरिक चौथा याच्या नावावरून 'फ्रेडरिकनगर' या नावाने वासहत सुरू केली. हे त्यांचे मुख्यालय होते.

- 1777 :  सेरामपूर हे डेन्मार्कच्या राजाच्या नियंत्रणाखालील एक मोठे शहर बनले. तसेच सेरामपूर हे मिशनऱ्यांसाठी एक प्रसिद्ध आश्रयस्थान बनले. तेथिल मिशनऱ्यांच्या सांस्कृतिक व शैक्षणिक कामामुळे सेरामपूर नावारुपाला आले.
- 1845 :  भारतात जम बसविण्यात पुढे अपयशी ठरल्याने  सेरामपूर व त्रंकेबार या वसाहती ब्रिटिशांना विकून टाकल्या.




# 5) फ्रेंच

- स्वातंत्र्यपूर्व भारतात व्यापारी म्हणून युरोपीय लोकांमध्ये सर्वांत शेवटी फ्रेंच आले.
- 1664 : फ्रान्स ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली.
- 1668 : फ्रेंचांनी भारतातील पहिली वसाहत केरॉन याने सुरत येथे स्थापन केली.

- 1669:  मसलीपट्टणम येथे वसाहत स्थापन केली.
- 1673 :  मार्टिन व लेस्पी यांनी वालीकोंडपुरमच्या मुघल गव्हर्नरकडून एक गाव मिळवले आणि हेच गाव पुढे पाँडिचेरी म्हणून विकसित झाले.
- मार्टिन पहिला गव्हर्नर



- 1690: फ्रेंचांनी मुघलांकडून बंगालमधील चंद्रनगर जिंकले .
- पुढे माहे, यानम व कारीकल हे ठिकाण मिळविले.
- 1742: डुप्ले हा फ्रेंच गव्हर्नर म्हणून भारतात आला.

# भारतातून युरोपियनांचा परत जाण्याचा क्रमः

1) डच (1825)

2) डेन्मार्क (1869)

3) ब्रिटिश (15 ऑगस्ट 1947)

4) फ्रेंच (1 नोव्हेंबर 1954)

5) पोर्तुगिज (19 डिसेंबर 1961)



# ब्रिटिशांचे भारतात आगमन

- भारतात व्यापाराच्या उद्देशाने लंडनमध्ये ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना
- एलिझाबेथ राणीने सुरूवातीस 15 वर्षांसाठी या कंपनीस पूर्वेकडील देशांशी व्यापाराची सनद दिली.
- 1609 मध्ये राजा जेम्स पहिला याने कंपनीला कायमस्वरूपी सनद दिली.

- **1615 :** इंग्रज वकीलसर थॉमस रो याने जहांगीर बादशहाकडून प्रथम व्यापारी सवलती मिळविल्या. यामुळे सुरवातीच्या काळात इंग्रजांनी सुरत, मछलीपट्टण, मद्रास, कोलकाता, मुंबई याठिकाणी आपल्या वखारी उघडल्या.
- **उद्देश :** अधिकाधिक नफा मिळविणे हाच ब्रिटिशांच्या व्यापारवादी अर्थव्यवस्थेचा प्रमुख उद्देश होता.
- साम्राज्यविस्ताराचा हेतू साध्य करण्यासाठी इंग्रजांना प्रथम पोर्तुगिज, त्यानंतर डच व शेवटी फ्रेंचांबरोबर संघर्ष करावा लागला.



# इंग्रज - फ्रेंच संघर्ष (1746 - 1763) (तीन कर्नाटक युद्धे )

- 1746 ते 1748 या काळात इंग्रज-फ्रेंच यांच्यात कर्नाटकचे पहिले युद्ध झाले.
- सेंट थोम लढाई (1748): कर्नाटकचा नवाब अन्वरुद्दीन व फ्रेंच यांच्यात झाली. नवाब अन्वरुद्दीनने दोघांना आपल्या भूमीवर लढण्यास मनाई केली. त्यातच डुप्लेने 'मद्रास' जिंकल्यावर ते देण्याचे आमिष नवाबाला दिले, पण नंतर पाळले नाही. त्यामुळे नवाबाने सैन्य पाठवले, जे पराजित झाले. फ्रेंचांचे नेतृत्व कॅप्टन पॅराडाइजकडे, तर नवाबाचे नेतृत्व महफूजन खानकडे होते.

- 1740 ते 1748 दरम्यान ऑस्ट्रिया व प्रशिया यांच्यात चालू असलेले युद्ध 'ए-ला-चॅपेल' च्या तहाने संपुष्टात आले.
- या तहामुळे 1746-48 या काळात इंग्रज-फ्रेंच यांच्यातील कर्नाटकचे पहिले युद्धदेखील समाप्त झाले.
- या तहानुसार फ्रेंचांनी इंग्रजांना 'मद्रास' परत केले व त्याबदल्यात उत्तर अमेरिकेतील ' लुईसबर्ग' फ्रेंचांना मिळाले.

# दुसरे कर्नाटक युद्ध (1748 - 54)

- 1748 : निजाम-उल-मुल्कच्या निधनानंतर हैद्राबादच्या वारसापदासाठी त्याचा मुलगा नासीरजंग व त्याच्या मुलीचा मुलगा मुजफ्फरजंग यांच्यात कलह सुरू झाला.
- तर कर्नाटकचा नवाब अन्वरूद्दीन याची गादी आपणास मिळावी म्हणून चंदासाहेबदेखील प्रयत्नशील होता.(चंदासाहेब हा अन्वरूद्दीनचा मेहुणा आणि दिवाण होता )

- या विवादांचा फायदा ड्युप्लेने करून घेतला. त्याने मुजफ्फरजंग व चंदासाहेब यांची बाजू घेऊन त्यांना गादी मिळवून देण्याच्या मदतीचे आश्वासन दिले. त्यामुळे इंग्रजांनी देखील नासिरजंगला हैद्राबादचे निझामपद मिळवून देण्याची व अन्वरूद्दीनचे कर्नाटकचे नवाबपद सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी स्वीकारली.
- यातूनच इंग्रज व फ्रेंचांचे दुसरे कर्नाटक युद्ध घडून आले.

- मुझफ्फर जंग, चंदासाहेब व फ्रेंच सैन्याने ऑगस्ट 1749 मध्ये वेलोरजवळ अंबुर येथे अन्वरुद्दीनला पराभूत करून ठार केले.
- वलूवावूर येथे नासिर जंगचे मुझफ्फर जंग व डुप्ले यांच्याशी युद्ध झाले. यात 1750 मध्ये नासिर जंग मारला गेला.

- तिरुचिल्लापल्ली येथे अन्वरुद्दीनचा मुलगा मुहम्मद अलीने इंग्रजांकडे आश्रय घेतला. किल्ल्याला फ्रेंच व चंदासाहेबाने वेढा दिला. त्याला शह देण्यासाठी म्हणून इंग्रजांनी रॉबर्ट क्लाइव्हच्या नेतृत्वात फ्रेंचांच्या अर्काटला(कर्नाटक )वेढा दिला व ते जिंकून घेतले.
- तिरुचिल्लापल्लीची फ्रेंच फौज अर्काटला वाचविण्यासाठी आली. त्यामुळे तिरुचिल्लापल्ली येथे फ्रेंच हरले व अर्काट पण हातून गेले. याच सुमारास चंदासाहेब तंजावरच्या राजाकडून मारला गेला.

- तिरुचिल्लापल्लीच्या पराभवाचे कारण फ्रेंच कंपनीने डुप्लेवर फोडले. 1754 साली त्याला फ्रान्सला परत बोलविण्यात आले व त्याच्या जागी फ्रेंचांचा गव्हर्नर म्हणून गॉडेव्ह्यूची नियुक्ती करण्यात आली.
- इंग्रज व गॉडेव्ह्यू (फ्रेंच) यांच्यात पाँडिचेरीच्या तहाने हे युद्ध संपले. यानुसार मद्रास, फोर्ट सेंट डेविड व देविकोटा ब्रिटिशांकडे, तर पाँडिचेरी, कारिकल फ्रेंचांकडे गेले.

# तिसरे कर्नाटक युद्ध (1758 - 63)

पहिल्या कर्नाटक युद्धाप्रमाणेच तिसऱ्या युद्धाचे कारणही युरोपात सुरू झालेले युद्ध होते.

युरोपात 1756 मध्ये इंग्रज व फ्रेंच यांच्यात सुरू झालेल्या 'सप्तवार्षिक युद्धा' चा प्रभाव पडून भारतातही इंग्रज व फ्रेंच यांच्यात युद्ध सुरू झाले.

- एप्रिल 1758 मध्ये फ्रेंचांचा काऊंट लॅली गव्हर्नर म्हणून भारतात आला. तोपर्यंत इंग्रजांनी बंगालमध्ये प्लासीत विजय मिळविला होता.
- तेथील साधनसामग्रीचा वापर या भागात करणे त्यांना शक्य झाले होते. तसेच क्लाईव्ह व वॅटसन यांनी मार्च 1757 मध्ये फ्रेंचांचे चंद्रनगर ताब्यात घेतले होते.
- इंग्रज सिराज उद्दौलासारखी आपली अवस्था करतील असे वाटून सलाबत जंग याने फ्रेंचांशी संबंध तोडले व तो इंग्रजांना शरण आला. इंग्रजांचे नेतृत्व सर आयर कूट याच्याकडे होते.



# वाँदिवॉशची लढाई (22 जानेवारी 1760)

इंग्रज व फ्रेंच यांच्यात अंतिम निर्णायक लढाई वाँदिवॉश येथे झाली.

वाँदिवॉश हा कर्नाटक राज्यातील एक किल्ला होता.

या युद्धात ब्रिटिशांचा सेनापती आयर कूट हा होता.

पाँडिचेरी, जिंजी व माही बंदर ब्रिटिशांनी जिंकले.

या लढाईच्या सुरुवातीला फ्रेंचांनी सेंट डेव्हिड किल्ला जिंकून घेतला.

या लढाईत फ्रेंचांना मद्रास जिंकता आले नाही. फ्रेंचांचा अंतिम पराभव झाला.

- बुसीला युद्धकैदी म्हणून पकडण्यात आले. या लढाईमुळे फ्रेंचांचा दक्षिण भारतातील प्रभाव संपुष्टात आला.
- 1763 सालीच्या पॅरिसच्या तहाने सप्तवार्षिक युद्ध थांबले, पाँडिचेरी व काही प्रदेश फ्रेंचांना परत मिळाला. ते तेवढ्या पुरतेच मर्यादित राहिले.

# बंगाल - इंग्रज संघर्ष

